प्रकरण चौथे

# ‘दर्पण’ मधील लेखनाचा वाङ्मयीन अभ्यास

=====================================================

## प्रकरण चौथे

## `दर्पण` मधील लेखनाचा वाङ्.मयीन अभ्यास

=====================================================

### प्रास्ताविक :

`दर्पण` मधील लेखनाचा सामाजिक अभ्यास केल्यानंतर आता त्यामधील लेखनाचे वाङ्.मयीन विशेष पहावयाचे आहेत. `दर्पण` च्या चार वर्षांच्या कालावधीमध्ये मराठी भाषेचे बदलत गेलेले स्वरूप आणि वाङ्.मयीन जाणीव यांचा विचार करणे गरजेचे ठरते. मराठी भाषेला वृध्दिंगत करणाऱ्या परिस्थितीचाही स्थूलमानाने विचार करायला हवा.

इ.स.१८१८ साली पेशवाई नष्ट झाली. आणि इंग्रजी राजवट सुरू झाली. सर्व बाजूंनी मोडकळीस आलेल्या मध्ययुगीन संस्कृती-मध्ये इंग्रजी अंमल असल्याबरोबर अल्पकाळातच अनेक स्थित्यंतरे झाली. पाश्चात्य लोक आणि एतद्देशीय लोक यांच्या प्रयत्नातून शिक्षण-प्रसार, ग्रंथनिर्मिती, नियतकालिके, या माध्यमाद्वारे मराठी भाषेमध्ये हळू हळू बदल घडत गेला. इंग्रजीसारख्या जगातल्या प्रगत भाषेशी मराठी भाषेचा संबंध आला आणि मराठी भाषेला अगदी वेगळे वळण लागले. शब्दकोश निर्माण होऊ लागले. व्याकरणाची निर्मिती होऊन मराठी भाषेला साचेबध्द आणि काटेकोर करण्याचा प्रयत्न होऊ लागला.

`दर्पण` च्या निर्मिती अवस्थेमध्ये इंग्रजीचा सुरूवातीचा कालखंड आणि अस्तंगत पावलेल्या पेशवाईच्या कालखंडाचा विचार करावयास हवा. तत्कालीन लेखन हे पेशवाईमध्ये पुन: उफाळून आलेल्या संस्कृत प्राबल्याचे व सुरूवातीच्या इंग्रजीच्या अशा संमिश्र परिणामातून निर्माण झालेले आहे. निश्चितपणे तीला शुध्द स्वरूपाची मराठीही म्हणता येत नव्हते किंवा तत्कालीन भाषेचे स्वरूपही मानता येत नाही. बालबोध आणि काहिशी मिशनरी वळणाची छाप असलेली मराठी असेच तिचे स्वरूप होते. `दर्पण` मध्ये याचा प्रत्यय वेळोवेळी जाणवतो. मराठी भाषा शुध्द करण्याची प्रक्रीया त्या कालखंडात सुरू झालेली असली तरी वेत्यांचा प्रभाव पूर्णपणे झुगारून टाकता आला नाही. १८३२ साली `बाँबे नेटिव्ह एज्युकेशन` या शैक्षणिक संस्थेची सुरूवात झाल्यानंतर ज्या काही विद्वानांनी शिक्षणासाठी क्रमिक पुस्तके लिहिली तीही इंग्रजी सत्तेला साजेशीच होती. त्यामुळे मराठी भाषेचा विकास हा इंग्रजी भाषेच्या मागोमाग होत असल्याचे जाणवते.

शिक्षणाची मक्तेदारी एका ठराविक वर्गातच राहिली असल्यामुळे

त्याचाही स्वाभाविक परिणाम भाषेवर झाला. वाङ्मयाची भाषा जरी सुधारली तरी व्यावहारिक जीवनामध्ये मात्र तिचा फारसा वापर वाढला नाही. मुंबईच्या आजूबाजूला असणाऱ्या प्रांतात जी वाङ्मयीन स्थित्यंतरे होत होती त्याचाही फारसा परिणाम मराठीवर झाला नाही. एकंदरीत पाश्चात्य लोकांनी स्वत:च्या सोईसाठी निर्माण केलेले शिक्षणाचे साधन आणि एतद्देशीयांची त्या संदर्भात असणारी तळमळ या प्रयत्नातून शिक्षणप्रसार, ग्रंथनिर्मिती, नियतकालिके यांचा प्रसार हळू हळू मराठीत झाला. भाषेचे महत्व लोकांच्या लक्षात येऊ लागले. मराठी भाषेला सुस्पष्ट, अर्थयुक्त आणि समाजप्रवण करण्याची प्रक्रिया अंमलात येऊ लागली.

मराठीतील पहिले नियतकालिक म्हणून `दर्पण` चे कार्य नि:संशय मोठे आहे. ते कार्य योग्य आहे की नाही यापेक्षा ते प्रथम कार्य आहे हेच महत्वाचे आहे. ज्ञानप्रसाराबरोबरच समाजमनाला एक ठराविक दिशा देण्याचं कार्य `दर्पण` ने आरंभिले. असंख्य मराठी भाषिकांच्यासमोर वृत्तपत्रातून नुकत्याच बदल घडत असलेल्या मराठी भाषेचा तयार नमुना ठेऊन आपल्याबरोबरच त्यांनाही बदल घडवून आणाणेस भाग पाडले. बाळशास्त्री जांभेकरांचा ज्ञानदानाबरोबरच वाङ्मयीन प्रयत्न नि:संशय मोठा आहे. `दर्पण` मधील मूळ लेखन बाळशास्त्री जांभेकर करत होते. त्याचा मराठी तर्जुमा जनार्दन वासुदेवजी या मराठी आणि संस्कृत भाषेत पारंगत असलेल्या विद्वान गृहस्थाने केला. `दर्पण` चा वाङ्मयीन विचार करत असताना या दोन्ही लेखकांचा विचार होणे अपरिहार्य आहे. बाळशास्त्री जांभेकरांचे मुळातील विचार म्हणून त्यांचे इंग्रजी लेखन येथे आधाराला घेतले असून वाङ्मयीन पाहणी करताना जनार्दन वासुदेवजी (नाना) यांचे श्रेय नजरेआड केलेले नाही.

नानाविध विषय

बाळशास्त्री जांभेकरांचा `दर्पण` वृत्तपत्र सुरू करण्याचा उद्देशच मुळी ज्ञानदानाचा होता. लोकांना ज्ञान देण्याच्या मूळ हेतुला धक्का न लावता सर्व विषयांना पत्रात स्थान देण्यात येत असे. `लोकस्थिती, धर्मरीती आणि उपयोगी फेरफार घडवून आणणे` हे नियतकालिकाचे प्रमुख कर्तव्य आहे अशी बाळशास्त्र्यांची धारणा होती. त्यामुळे विद्याविषयक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, व्यक्तिमहात्म्य, मृत्यूलेख, सुधारणाविषयक आणि मनोरंजनात्मक अशा नानाविध विषयांची चर्चा `दर्पण` मधून झालेली आहे. विद्याविषयक विचार मांडत असताना मोठ मोठ्या विद्वानांची मते, शिक्षणविषयक विचार, त्यांचे आदर्श, पाश्चात्य लोकांची ज्ञानलालसा, जिद्द, धडपड, जिज्ञासू वृत्ती वाचकांच्या अंगी उतरविण्याच्या समंजस भूमिकेतून लेखन झालेले आहे. `नियतकालिक लेखापासून जे स्वार्थ होतात त्याविषयी` या लेखातून नियतकालिकाचे फायदे बंगाल प्रांताची झालेली प्रगती डोळ्या-समोर ठेवून सांगितलेले आहेत. `वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी` या लेखात तर विज्ञानविषयक माहिती दिली आहेच शिवाय पाश्चात्य लोक आणि एतद्देशीय लोक यांच्या प्रयत्नांची तुलना करून देऊन `बुध्दी कोणत्याही एका देशातच असते असे नाही ती सर्व देशात समान असते त्यासाठी प्रयत्न महत्वाचे` असे सांगितलेले आहे. `विद्या हे बळ आहे` या लेखात तर एतद्देशीयांचे मागासलेपण आणि ब्रिटिशांचे पुढारलेपण सांगून लोकांनी शिक्षणाकडे वळावे आणि आपल्या देशाचे मागासलेपण दूर करावे असे लिहिले. लोकांना शिक्षणाभिमुख करण्याच्या दृष्टीने त्यांनी एल्फिन्स्टन, ड्युइमोल साहेबांच्या कार्याचे महत्वही विशद करून सांगितले आहे.

सामाजिक किंबहुना सुधारणाविषयक विचारांची चर्चा करीत

असताना पाश्चात्य लोकांनी विज्ञानात केलेली प्रगती, आपला अंधप्राय आणि धर्मभोळा समाज यांचे एतद्देशीयांना सम्यक आकलन व्हावे अशा वृत्तीतून लेखन झालेले आहे. ` सरकारने पुण्यात इंग्रजी शाळा घातली, ` पुण्यातील इंग्रजी शाळेवर येस्डेल साहेब गुरू नेमिला ` अशा वृत्तामधून शिक्षणविषयक घडामोडी जनतेपर्यंत पोहोचविल्या. ` शिक्षा मंडळीस सरकारातून पैका कमी झाला ` आणि ` रहदारी जकाती व मुलखी परोपकारी कामात वाढ ` या लेखातून मात्र सरकारच्या चुकीच्या धोरणाबद्दल तिव्र नापसंती व्यक्त करून परखड टीकाही केली. सरकारचे धोरण एतद्देशीयांना प्रगतीपथाकडे नेणारे असावे अशी त्यांची धारणा होती. म्हणून तर बंगाल आणि मद्रास प्रांतात बँकांची निर्मिती झाली होती तशी ` सरकारने मुंबईस पेढी घालण्याचे अगत्य ` अशी इच्छा व्यक्त केली. ` हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा प्रकार आहे, ` या लेखातून समाजातील अपप्रवृत्ती समाजविघातक कशा आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. ` जगन्नाथ शंकरशेट जे.पी.मॅजिस्ट्रेट ` झाले त्यावेळी एतद्देशीयांमधील पहिला पुरुष वरिष्ठ जागेवर काम करू लागला असे लिहिले आहे. यामधून त्यांचा देशाभिमान दिसून येतो. सामाजिक उन्नतीच्या अनुषंगानेच त्यांनी लेखन केले.

इंग्लंडमधील होणाऱ्या राजकीय घडामोडी, सरकार आणि जनतेमधील झालेला संघर्ष, त्यातून निष्पन्न झालेले लोकोपकारक कायदे याचे आकलन ` इंग्लंड देशातील राजकीय सुधारणेसंबंधी बील संमत झाले, ` ` इंग्लंड देशातील राज्यरीतीबद्दल करण्यासंबंधी यत्न, ` ` विलायतचे बादशहाचे कौंसलात फेरफार ` या लेखातून करून दिले आहे. नकळतपणे स्वातंत्र्याची जाणीवही त्या अनुषंगाने एतद्देशीयांना करून देतात. ` एतद्देशीयास आदरे करून लिहावे ` या लेखात तर पाश्चात्य अधिकाऱ्यांवर टीका करून आम्ही तुमच्यापेक्षा कुठे कमी नाही, असे सांगितले आहे.

`अस्तित्स ऑफ पीसच्या सनदा वगैरे` अशा लेखातून सरकारमध्ये बदलणारे कायदेकानू यांची जाण एतद्देशीयांना करून दिली.

आर्थिक बाबतीत विचार करत असताना `शेतकरी लोकास सरकारचे उत्तेजन` या लेखात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवला आणि शेतिविषयक सरकारने धोरण निश्चित आखावे असे सांगितले. `कंपनी सरकारच्या तीन इलाख्यातील जमाखर्चाची ` या लेखात आकडेवारीसह मुंबई, मद्रास व बंगाल प्रांतातील जमाखर्च वाचकांपर्यन्त पोहचवला व खर्च अधिक का व कशासाठी झाला याचा सरकारला जाबही विचारला आहे.

व्यक्तिपरिचय करून देत असताना `राजाराममोहन रॉय` यांच्या कर्तृत्वाचा गुणगौरव करून त्यांचा आदर्श एतद्देशीयांनी घ्यावा, `ह्यइलेल साहेबांची` ज्ञानलालसा, जिज्ञासू वृत्ती, धडपड आणि `सामलदास देसामाई` याचे धैर्य एतद्देशीयांनी घ्यावे ही जाणीव ठेवून लेखन केलेले आहे.

मृत्यूलेख लिहित असताना बाळशास्त्री गवे यांचे थोर कार्य आणि ते अल्पकाळी निधन झाल्याची खंत व्यक्त केली आहे. `चिमाजी-राव आप्पासाहेब ` यांच्या मृत्यूची बातमी देत असताना त्यांचा कुल-वृत्तांत दिला आहे.

सांस्कृतिक बाबतीत चर्चा करत असताना `कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा सुरू झाली` या लेखातून प्राचीन नाटकावर प्रकाश टाकून समाजसुधारणेच्या कामी नाटक हे सांस्कृतिक माध्यम उपयोगी ठरू शकेल असे स्पष्ट लिहिले आहे. तर ` हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलाम-

गिरीचा प्रकार आहे. या लेखात नाचतमाशांना उत्तेजन दिल्यास वाईट परिणाम कसे होतात हे स्पष्ट केले आहे.

` जामे जमशीद नावाचे नवे गुजराथी वर्तमानपत्र, ` काही बानकोटास आगीची नाव करून गेले, ` ठग किंवा फासीगर ` अशा प्रासंगीक विषयावर पण बाळशास्त्र्यांनी लिहिले आहे. ` स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमान पत्रापासून होणारी फळे व कार्ये ` या लेखात तर नियतकालिक विषयक त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतोच शिवाय आदर्श पत्रकार कसा असावा हेही दिसून येते. ` दर्पण ` छापण्याचे रीतीत काही फेरफार, ` ` दर्पण चालविण्याची आमची रीती ` या लेखातून वाचकांच्या विनंतीनुसार ` दर्पण ` पत्रात केलेली सुधारणा याचे विवेचन केलेले आहे.

धार्मिक विषयावर लिहित असताना हिंदू धर्माबरोबरच ख्रिस्ती, मुसलमान धर्मातील दोषावर बोट ठेवून बदलत्या काळानुसार धर्माने बदलले पाहिजे, व धर्म अखंड मानव जातीच्या कल्याणासाठी असला पाहिजे अशी त्यांची धर्मविषयक भूमिका होती. स्वत:च्या धर्माभिमानास धक्का न लावता तटस्थ भूमिकेतून लिहिले आहे. ` ख्रिस्ती झालेला गिरमाजी आपा याचा वृतांत ` या लेखात धर्मांतराची अगदी काटेकोरपणे बातमी दिली आहे. ` ले.क.वानस केनडी यांचा ग्रंथ प्राचीन धर्म व हिंदू धर्म, ` ` पाद्री वुईलसन साहेबाचा ग्रंथ हिंदू धर्म प्रसिध्दिकरण ` या ग्रंथांची परिक्षणे करीत असताना अभ्यासू वृत्ती, सुक्ष्मनिरिक्षण, प्रांजळपणा, नि:पक्षपाती दृष्टी या गुण वैशिष्टयासहीत केलेली आढळतात.

वरील नानाविध विषयाबरोबरच वाचकांच्या विविध विषयपर असंख्य पत्रांना बाळशास्त्र्यांनी स्थान दिले आहे. जनतेला प्रबोधनात्मक

विचार सांगून जागृत करणे आणि देशाला प्रगती पथाकडे नेणे या वृत्तीतून त्यांनी लेखन केलेले आहे. त्यासाठी विषय निवडण्याची चोखंदळ पध्दती उल्लेखनीय आहे. `दर्पण` च्या लेखनाचा सारासार विचार केल्यानंतर त्यातील वेगवेगळ्या विषयाचे नाविन्य तर जाणवतेच पण ते निवडण्याचा बाळशास्त्र्यांचा हेतुही लक्षात येतो. तत्कालीन लोकांच्या-समोर जे ज्वलंत असे विषय होते त्यासंदर्भात त्यांना जास्तीत जास्त माहिती घावी किंवा ज्ञान घावे हा हेतू स्पष्ट होतो. विषयाच्या निवडीमध्ये कोणत्याही एका विषयाला पुन: पुन: स्थान न देता त्याची निवड चोखंदळ वृत्तीने झाली आहे. पाश्चात्य राष्ट्रातील सुधारणावादी विषय जसे येतात तसेच एतद्देशीयांचे मागासलेपण दाखवून देण्याचा ते प्रयत्न करतात. सुक्ष्मनिरिक्षण, संवेदनशिल वृत्ती, प्रसंगी आढळणारा तटस्थपणा, दुरदृष्टीपणा, विषयाचे संपूर्ण ज्ञान असल्याशिवाय ते न लिहिण्याची प्रवृत्ती, पुराव्याव्यतिरिक्त आरोप न करणे आणि सर्वव्यापी समंजसपणा याचा प्रत्यय `दर्पण` मधील नानाविध विषयाचे वाचन केल्यानंतर येतो.

## विचार सौंदर्य

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या कालखंडाचा विचार करता पेशवाईतील भ्रष्ट राज्यसत्ता आणि कायदेशीर वृत्तीच्या इंग्रजांचा अंमल यांचा परिणाम समाजातल्या प्रत्येक स्तरावर झालेला होता. इंग्रजांच्या मर्जीत राहून त्यांच्या राज्यकारभाराचा उदोउदो करणारे जसे लोक होते तसेच आपल्यावर इंग्रजांचे परचक्र आले आहे असे भान राखणारे समाजसुधारकही होते. एकाचवेळी या दोन आघाड्यांच्यावर प्रबोधनाचे कार्य करणे `दर्पण` कारांना भाग होते. प्रतीगामी आणि पुरोगामी वृत्तीच्या लोकांना आपल्याबरोबर घेऊन जाणेही गरजेचे होते. सर्व-

सामान्यांच्या गळी आपले विचार उतरविण्याच्या दृष्टीने त्यांना बदलत्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक प्रश्नांची चाहूल करून देणे हाच `दर्पण` मधील विचारांच्या पाठीमागील मूळ हेतू होय. बाळशास्त्र्यांनी आपले विचार द्विवेच्या पोटी मांडलेले असून समाज प्रबोधनामध्ये आपले स्वत:चे मानवीक दर्शन विचारांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. `वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी` या स्फुटलेखाच्या प्रारंभीच ते लिहितात,

` विद्वान आणि मूर्ख, या दोहोमध्ये अंतर प्रकाश, अंधकार, सत्य-असत्य, मनुष्याची बुध्दि आणि पशुचे ज्ञान, यांमध्ये जितके आहे तितकेच आहे. मूर्ख आपलें आयुष्याचा एकरूप प्रवाहें करून संतुष्ट असतो, ते आपलें समोवतें सृष्टीतील पदार्थ असतात तितके मात्र पाहातो, त्याचा इच्छा संसारातील अवश्य पदार्थांचे बाहेर जात नाहीत, आणि त्यास आपला देश व आपण ज्यांमध्ये राहातो ते लोक यांचे मात्र ज्ञान असतें. इकडे मनुष्याच्याने जितके श्रम होतात तितके करून विद्वान ईश्वराचे कृत्यांचे गुन्ह्यांचा शोध करायास यत्न करितो, अंतरिक्षांतील जडांचा गति जा नियमांप्रमाणे चालतात ते नियम शोधून काढितो, विचार करून आणि अनुभव घेऊन तो समोंवताले सृष्टीतील पदार्थांची कारणे आणि गुण समजतो. ते समजले म्हणजे तो आपले ज्ञान मनुष्याचे कल्याण करण्याचे उपयोगास लावितो, आणि सृष्टींतील मूळभूते ही त्या कामात आणितो` (१)

वरील विचारावरून पाश्चात्य लोक व हिंदुस्थानी लोक यांच्या बौध्दिक सामर्थ्याची आणि आकलनाची तफावत बाळशास्त्री आपल्यासमोर ठेवतात. लेखाच्या सुरूवातीलाच असे विचार मांडून नंतरच मूळ विषयाला हात घालण्याची आणि त्या विषयाचे आकलन करून देण्याची हातोटी `दर्पण` कारांची होती. विज्ञानाची आणि नवीन शोधाची माहिती करून देण्याच्या निमित्ताने संपादकांच्या मनात आलेल्या गोष्टी वाचकांपर्यंन्त

पोहचविणे हेच या लेखाचे प्रयोजन आहे. या लेखात `दर्पण` कारांच्या विचार सौंदर्याचे दर्शन घडते. वाक्ययंत्र हा मूळ विषय अगदी चारपाच ओळीतच त्यांनी आटोपला आहे. याच लेखाच्या उत्तरार्धात विद्येचे महत्व पटवून देत असताना ते म्हणतात, `जे सरकार विद्येचे वृध्दीस आश्रय देतें, तेथे मनास विद्येचा संस्कार करण्यास लोकांस विशेष उत्साह होतो, आणि जुलुमगारांचे अंमलापेक्षा तशा राज्यांत हे उद्योग अधिक सफळ होतात. अशा उद्योगांपासून विद्या सुरूपास येत्ये, आणि लोकांचा ज्ञानसंग्रह वाढतो. एके पिढीचे लोक नवे शोध करितात, त्यांपासून दुसरे शोध पुढली पिढी करित्ये, या रीतीनें विद्या आणि कळा वाढतात आणि ज्ञानाचा लवकर प्रसार होतो. परंतु आपलीं मतें चांगले मार्गास लावणें हे जितकें लोकांचे स्वाधीन आहे तितके राजाचे नाही, हे आमचे लोकांनी ध्यानात धरावें, आणि हे दुसरे लक्ष्यात ठेवावें की ज्यांस विद्या संपादन करायाची आहे, त्याणी जर आपले मनांतील द्वेषबुध्धि चालविली नाही तर त्यांचा उद्योग फुकट जाईल.` (२) `दर्पण` कारांच्या विचारांचा सखोलपणा आणि तो सोप्या शब्दात समजावून सांगण्याची त्यांची पध्दती प्रस्तुतच्या लेखावरून दिसून येते.

`विद्या हे बळ आहे` हे लॉर्ड बेकनचे उद्‌गारच मुळी `दर्पण` कारांनी आपल्या लेखाला शिर्षकरूपात दिले. विचारवंतांचे आणि विद्वानांचे उद्‌गार, वक्तव्ये बाळशास्त्री आपल्या विचारांच्या पुष्टी-दाखल अशारीतीने देतात. हिंदुस्थान व पाश्चात्य राष्ट्रातील विद्या-विषयक पार्श्वभूमी यांमधील अंतर विशद करताना बाळशास्त्र्यांनी पुढील विचार मांडला आहे. `या दोन पृथ्वीचे भागांत विद्येची वृध्दि बराबरीनें झाली नाहीं याचीं दुसरीं कारणें काय असतील तीं असोत, परंतु आह्मास वाटतें कीं, साधारण विद्येचे मुख्य उपयोग यादेशातील लोकांस चांगलें समजले नाहींत हें त्यातून एक कारण आहे. याविषयीं

प्रमाण इतकेंच लिहिलें पाहिजे कीं, या देशांतील विद्वान लोकांनी न्याय व वेदांत या शास्त्रांकडे जितकें लक्ष्य दिलें तितकें उपयोगी कला कौशल्यांकडे दिलें असतें, तर त्यांचे श्रमापासून बहुत चांगल्या गोष्टी घडल्या असत्या. परंतु सर्व विद्या धर्मांचे उपयोगी, किंवा वादांमध्यें जय मिळविण्याचें साधन, तीचा मनुष्याचे संसारांतील कामाशीं कांहीं उपयोग नाहीं असें त्या प्राचीन विद्वान लोकांचें मत होतें असें वाटतें. हिंदु व मुसलमान या लोकांत शिल्प, भुगोलाचे ज्ञान, इतिहास यांमध्यें परिश्रम कमी याचें कारण हें आहे.

परंतु ही गोष्ट सर्वांस संमत आहे कीं, काळ व पदार्थांची स्थितिही बदलली म्हणजे जुन्या रीति सोडून नव्या घेण्याचें प्रयोजन पडतें. या देशाचे स्थितीमध्यें गेले वीस वर्षांत मोठा फारफेर झाला, जापासून प्राचीन संप्रदाय बहुत मोडले, आणि जो फेरफार झाला म्हणोन ही गोष्ट दिवसानुदिवस अधिक अधिक आवश्य होत आहे की, या देशचे लोकांनी आपलें लक्ष्य संसारोपयोगी कला कौशल्यांकडे घावें, त्यांचे व्यवहारांत उपयोग कसे होतात ते शिकावे, आणि सारांश, जा गोष्टीनी युरोपियन लोक या देशचे लोकांपेक्षां श्रेष्ठता पावले आहेत, आणि जा गोष्टी नाहींत म्हणोन या देशाची इतकी दुर्दशा झाली, त्या सर्व त्याणीं साध्य कराव्या" (३)

प्रस्तुतच्या उता-याकरून एतद्देशीयांना विद्येचे मुख्य उपयोग समजले नाहीत तेंव्हा त्यांनी विद्येचा उपयोग व्यवहारात कसा उपयोगी पडतो हे शिकावे असे बाळशास्त्री सांगतात. विद्येचे महत्व पटवून देत असताना पाश्चात्य देशातील प्रगती वाचकांच्या डोळ्यासमोर ठेवतात व आपले मागासलेपणा आपण शिक्षणानेच दूर करू शकू असा आशावादही प्रकट करतात.

स्पष्टवक्तेपणा आणि त्यासोबतच काहीसा आवेशही त्यांच्या लेखनात कसा येतो त्याचे प्रत्यंतर पुढील उता-यावरून दिसून येते. ` जा आमचे देशचे लोकांत विद्या कमी, आणि जांचे या विषयींचे समज देशाचारांमुळे लहानपणीं विपरीत पडोन गेले असतात, त्यांची जेव्हां आम्ही अशी निंदा करितों, तेव्हां जा साहेब लोकांचे समज स्वच्छ, आणि जांची अभिरूची चांगले ठिकाणीं जडल्ये, ते साहेब लोक असे तमाशास जातात, त्याविषयीं कोणता आधार नाही, त्यांची आम्ही किती निंदा करावी ? लोकांचा चाली, समज, आणि ब-या-वाईट रीती, चालू थाव्या हें शहाणपण खरें, परंतु वर सांगीतलेला तोटा जांपासून होतो, त्या चाली वाढत अशा करणें हे मूर्खपणाचें किंवा अज्ञानपणाचें चिन्ह.

आम्ही ही गुलामगिरीची तक्रा लिहिली ही कोतवालांचे बंदोबस्तानें बंद होणार नाहीं. जी वाईट गोष्ट होण्यास ती गुलामगिरी अवश्य पाहिजे, ती गोष्ट पुर्वीं बंद झाली पाहिजे, म्हणजे ही गुलामगिरी पक्की बंद होईल, परंतु तिची मूळें अशी घट्ट झाली आहेत, की विद्या व मोठे ठिकाणी तसा आचार लोकांस दृष्टीस पडणें, या वांचून ती बंद होईल ही आशा व्यर्थ आहे. म्हणोन आम्ही या प्रसंगी मले आणि समर्थ इंग्रेज व या देशचे लोक यांस मुख्यत्वें लिहितों कीं, त्याणी आपली मनुष्यमात्राचे कल्याणाविषयींची इच्छा ,मनुष्यपणा आणि नीति यांहीकरून ही गुलामगिरीची रीति चालण्याचीं जीं साधनें आहेत तीं, आपल्यापासून उपाय होईल तेवढा करून बंद करावी, जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये, आणि हजारोंचे घरीं बुड आणि दु:ख ही येतात. ` (४)

` दर्पण ` मधील लेखन प्रबोधनाच्या भूमिकेतून मांडलेले असल्यामुळे

साहजीकच मोठ्या समजुती, समाजातील अपप्रवृत्ती यावर त्यांनी आघात केला. समाजाला नितीमत्तेचे, आचारसंहितेचे शिक्षण दिले पाहिजे या दृष्टीने त्यांनी लेखन केलेले आहे. बाळशास्त्र्यांचे युक्तिवादाचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. निव्वळ पत्रकार आणि विचारवंत या भूमिकेतून ' स्वतंत्र व पक्षपातरहित वर्तमान पत्रापासून होणारी कार्ये आणि फळे ' या स्फूटलेखात त्यांच्या विचारांचा तळ गवसतो. ते म्हणतात, ' प्रसिध्द छापाची जीं अनेक कार्ये आणि फळें आहेत त्यांमध्यें स्वतंत्र व पक्षपात रहित छापण्यापासून, अधिकार अयोग्य रीतीने चालविणे, किंवा अधिकार ज्यांजवळ दिला आहे त्या लोकांची वाईट वर्तणुक, यांवर धाक उत्पन्न झाल्यांवाचून कधीं राहात नाहीं यापेक्षों अधिक किमतीचें व बहुतांस हितकारक असें दुसरें छापाचें फळ क्वाचित नसेल. परंतु हें हितकारक फळ उत्पन्न होण्याकरितां अधिकारावरचे लोकांचे कृत्यांची बारीक परीक्षा आणि ज्यांची जीं कृत्यें चांगलें प्रकारचीं दिसतील त्यांची प्रसिध्दी (झाली) पाहिजे, तरच तें फळ उत्पन्न होईल. अशो लक्ष्यानें किंचित कोणी पुरूषाची गोष्ट बोलणें अगत्य पडलें, तर वर्तमान पत्राचें करणारानें कोणत्ये एके पक्षाचे लोकांचा आपणावर क्रोध होईल या भयामुळे, किंवा त्या पुरूषाचे प्रीती मुळे हें आपलें मोठें काम करायास मार्गे सरू नये. जेथे सर्व लोकांचे हिताचा संबंध असेल, तेथे त्याणें या वरचे दोन कल्पनांतून कोणती एक कल्पना मनात आणून आपलें काम निष्कृत्रिम करण्यास चुकूं नये.' (५) हा बाळशास्त्र्यांचा पत्रकारीतेवरील समर्पक विचार आजच्या पत्रकारांनाही आदर्शभूत ठरू शकेल असाच आहे. वृत्तपत्राचे महत्व त्या काळात त्यांनी किती पटले होते हे सहज लक्षात येते. वृत्तपत्राचे कार्य आणि फायदे एतद्देशीयांना समजून देण्याची तळमळ आणि वृत्तपत्राच्या प्रसाराची धडपड वरील विचारातून स्पष्ट होते.

`दर्पण` मधील लेखनातील निर्भिडता, परखडपणा आणि दूरदृष्टीपणा पुढील विचारातून स्पष्ट होतो.

`सरकारचे काम गाबाचा हातून जी दुष्कर्मे घडतात, त्या सर्वांमध्यें लांच व लबाडी यांपासून लोकांचा नाश फार होतो, आणि हें दुष्ट कर्म न्याय करण्यासंबंधि कोणी पुरुषाचे हातून जेव्हां घडतें तेव्हां तर फारच होतो. देशाची समृत्धि व त्यांतील लोकांचें सुख यास कारणें दोन आहेत, एक न्याय करण्याचे रीतीचा शुत्धपणा, आणि दुसरे, तो न्याय करण्यासाठीं जो बेत केला असेल तो चांगला चालणें. कां कीं, या दोहों वाचून वित्त विषाय वास्तविक निर्भय राहत नाही, आणि तो निर्भय राहाणें देशांत समृत्धि होण्यास आवश्य आहे, आणि या दोन गोष्टी असल्यावाचून कोणी कोणास उपद्रव केला असता त्यास उपाय राहाणार नाही, आणि त्यापासून उपद्रव करण्यास मर्यादा राहणार नाही, आणि हे तर लोक सुखी राहाण्यास अवश्य आहे. या करिता जो पुरुष आपणास लोकांचा न्याय करण्याचे कामावर नेमिलें, ही प्रतिष्ठा विसरून, आपला अधिकार वाईट ठिकाणीं लावतो, किंवा त्यापासून आपला लोभ तृप्त करण्यास प्रवृत्त होतो, त्या पुरुषाची सर्व प्रामाणिक मनुष्यानी निंदा आणि कंटाळा करावा. त्याणें सर्व लोकांचा अपराध केला म्हणोन सर्व लोकांनीं त्यास शत्रू-सारिखा समजून दूर करावा, त्याचें नाव सर्व लोकांचे तोंडांत असावें, आणि त्याशीं. व्यवहार करणें हा नीचपणा असें मोजावें. जो न्यायाचा व्यापार करितो, त्यास हें शासन फार निर्दय आहे काय ?[६]

`दर्पण` मधील लेखनाचे स्वरूप एखाद्या नारळासारखेच आहे. वरकरणी अभिव्यक्ती रूक्ष, ओबडधोबड, कंटाळवाणी असली तरी अंतरंग मात्र समृध्द आहे. समाजाविषयी जिव्हाळा, जीवनविषयक प्रगल्भ दृष्टी,

निवेदनातला साधेपणा, मारदस्त शब्द, एतद्देशीय तरूणांविषयी अभिमान, त्यांच्या अस्मिताजागृतीचा प्रयत्न यांनी हे लेखन समृद्ध झालेले आहे. `दर्पण` मधील विचार हे प्रामुख्याने एतद्देशीयांच्या सर्वांगीण उन्नतीच्या अनुषंगाने आणि देशाला प्रगतीपथाकडे नेण्याच्या ठाम भूमिकेतून मांडलेले आहेत. परिवर्तनाची सर्वांगीण कूस त्याला आहे यात वादच नाही.

प्रबोधनपर लेखनाची अभिनव पध्दती
---------------------------

बाळशास्त्र्यांच्या `दर्पण` चा उद्देश मुळी एतद्देशीयांना ज्ञान करून देणे आणि त्यांना प्रगतीच्या शिखराकडे नेण्याचा असल्यामुळे त्यातील लेखन हे सुधारणाविषयक दृष्टीने झालेले आहे. त्यासाठी बाळशास्त्री आपले खास विचार तर मांडतातच शिवाय आपल्या मताशी सहमत असलेला इतर वृत्तपत्रातील प्रगतीनिर्देशक मजकूरही वाचकांसमोर ठेवतात. विशेषाकरून कलकत्त्यामधील `रिफार्मर` या वृत्तपत्राचा मजकूर ते वारंवार देतात. `कलकत्त्यामधील हिंदू नाटकशाळा सुरू झाली` या लेखात शेवटी आता आता लिहितात, `आणि रिफार्मर वर्तमान पत्राचे लिहिणारा सारिखेंच आम्ही इच्छितों कीं, या नाटकांपासून जें मनोरंजन होईल तेणेंकरून देशांतील अमद जात्रा इत्यादि समारंभ बंद होतील.` (७) `विद्या हे बळ आहे` या लेखातही आपल्या मतांचा आढावा घेऊन झाल्यावर शेवटी आपल्या विचाराशी सहमत असलेला मजकूर `आम्ही कलकत्त्यामधील रिफार्मर वर्तमान पत्रांतून आलेले त्या संपादकाचे मत छापतों` असे प्रामाणिकपणे निर्दिष्ट करून दिला आहे. `आता समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनी सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दु:ख यांत पडावें. या काळांत संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कला यांचा अभ्यास, म्हणजे

ती यापासूनच प्राप्त होत्ये, असें झालें आहे. वास्तविक पाहिलें असतां सर्व काळ थोडेंबहुत असेंच आहे, परंतु सांप्रत संपत्ति आणि विद्या यांचा परस्पर संबंध साधारण पाहाणाराचे दृष्टीसही उघड येतो. विलायतेंतील लोकांमध्ये विद्येचा प्रसार झाला त्यामुळें त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील जा चमत्कारीक यंत्रांनी द्रव्य मिळण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रास मूळ कलाकौशल्यांची वृध्दि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षांही मनुष्यांचे संपत्ती विषयीं चांगलें हें राज्य घेतलें, आणि रक्षण केलें, हे सामर्थ्य त्यांस विद्येनें आले नव्हे ? बरें असेच हिंदुस्थानचे लोक पुढें कोणत्ये विलायत घेतील, ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचें कारण काय ? याचें कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षां विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय ? विलायत देश या देशांपेक्षां, आणि दुसरे बहुत देशांपेक्षां श्रेष्ठता पावला आहे, याचे कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय ? असें असतांही आमचे द्रव्यवान मित्र अशी अरूढ दृष्टीचे आहेत कीं, ते इंद्रियांचीं हजारों मलिन सुखें ज्ञानाचे स्वार्थापेक्षां चांगलीं मानितात, ते आपली संपत्ती व जमविलेलें द्रव्य फार वेडेपणाचे खेळांत घालवितात, परंतु विद्येचे कामासाठी एक पैसाही खरचीत नाहींत अशा साधारण गोष्टी लिहिल्या असतां त्यांचे विरूध्द कोठे आढळतें, म्हणोन आम्ही कबूल करायास सिध्द आहों की, या स्तुत्य उद्योगास आपल्या सामर्थ्यांप्रमाणे मदत करणारे आमचे लोकांत बहुत आहेत. या थोड्यांची गोष्ट आम्ही लिहिली नाहीं, परंतु आमचे लोकांतून जा बहुत करून लोकांचे डोळे विद्येचे स्वार्थाविषयीं आजून झांकले आहेत असें वाटतें, त्यांची लिहिली.` (८)

वरील `रिफार्मर` पत्रातील उतार्‍यावरून `दर्पण` चा समाजाला फायदा झाला पाहिजे, एतद्देशीयांना अज्ञानातून वर काढले

पाहिजे, जगाचे बदलते स्वरूप त्यांना सांगितले पाहिजे, व समाजात परिवर्तन घडून आणण्याच्या उद्देशाने आणि समाजमनाला नवीन दिशा देण्याच्या प्रवृत्तीतून इतर पत्रांचे मजकूर आधाराला घेतले आहेत. मोठमोठ्या विचारवंतांची मते, ग्रंथांचे आधार एवढेच नव्हे तर आपल्या विचाराशी सहमत असलेल्या वाचकांच्या पत्रांनाही त्यांनी अग्रक्रम देऊन प्रसिध्दि दिली आहे.

`दर्पण` चा पहिला अंक प्रसिध्द होण्यापूर्वी १२ नोव्हेंबर १८३१ रोजी पत्राचा उद्देश स्पष्ट करणारा `प्रस्ताव` प्रसिध्द करण्यात आला होता. पहिल्या अंकात तो पुन: देण्यात आला होता. प्रस्तावात `दर्पण` काढण्याचे मुख्य उद्दिष्ट मराठी व इंग्रजी मजकूर देण्याचा हेतू, कोणता मजकूर छापला जाईल इत्यादी सर्व गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. म्हणजे बाळशास्त्र्यांच्या विचाराची ठोस भूमिका अगोदरच ठरलेली होती. त्या भूमिकेला अनुसरूनच त्यांनी अखंडपणे वाटचाल केलेली आहे. तसेच आपण मराठी भाषेमध्ये पहिल्यांदाच नियतकालिक सुरू करत आहोत याची जाणीव बाळशास्त्र्यांना जशी होती तशीच ती जनमानसात रुजावी असा त्यांचा मनोदय असल्याचे प्रस्तावावरून स्पष्ट होते.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी आपण मराठीतील वृत्तपत्र सुरू करत आहोत, त्याची बांधणी करत आहोत याचा सार्थ अभिमान बाळशास्त्र्यांच्या मनामध्ये आहे. प्रस्तावात म्हटल्याप्रमाणे त्यांचा हेतू शुध्द आणि समाजसापेक्ष आहे. बाळशास्त्र्यांचे व्यक्तिमत्त्व बहुश्रुत आणि व्यासंगी असल्यामुळे त्यांनी `दर्पण` मधील नवविचार अभिमानाने रसिक वाचकापुढे सादर केलेले आहेत. `क्यु` या पत्रकर्त्याने जो पक्षपाताचा आरोप केला त्यावेळी जांभेकरांनी काढलेली स्पष्टोक्ती त्यांच्या समतोल आणि प्रगल्भ वृत्तीची निदर्शक आहे. पत्रकारितेला आवश्यक असणारी ही

वृत्ती आजही दुर्मिळच म्हणावी लागेल.

`दर्पण मध्ये सनसनाटी बातम्या विशेष आढळत नाहीत. `ठग किंवा फासीगर,` `पटूटावाग आइल आफ फ्रास मधून पळून गेल्याची बातमी` याच गुन्हेगारीवरच्या त्याकाळच्या मानाने थरारक बातम्या आहेत. `जे शुध्द मनोरंजन मात्र इच्छितात त्यांचीही -हृदये लहान लहान चमत्कारीक गोष्टीपासून संतुष्ट होतील` असे प्रस्तावात म्हटले आहे. त्या काळात `चमत्कारिक` किंवा `आश्चर्यकारक` वाटणाऱ्या बातम्या म्हणजे `बाबू कृष्ण मोहन बानरजी यास बाप-तिज्मा दिल्हा,` `काही परभू आनकोटास आगीची नाव करून मौजे-करिता गेले,` `सामलदास देसाभाई इंग्लंड देशाहून परत आला` या आहेत. त्या काळाच्या मानाने हेच मनोरंजनाचे विषय होते. विशेष करून धर्मांतर, विज्ञानविषयक जिज्ञासा, समुद्रप्रवासाचे धाडस, परदेश सफर याबाबतीत वाचकांच्यामध्ये उत्सुकता असे. आजच्याप्रमाणे बातम्यांच्या सनसनाटीपणापेक्षा प्रबोधकतेवर, प्रेरकतेवर `दर्पण` कारांचा अधिक भर दिसून येतो. ह्या नानाविध विषयांची चर्चा `दर्पण` नव्यानेच वाचकासमोर ठेवीत असल्यामुळे व नव्या गोष्टी वाचायला मिळाल्यामुळे साहजीकच वाचकाचे मनोरंजन होई. एकंदरीत ज्ञानदानाबरोबरच मनोरंज-नाच्या दृष्टीनेही `दर्पण` चे लेखन झालेले आहे. मनोरंजनात्मक लिखाणाकडून वाचकांची अभिरूची वाढत जाते हे बाळशास्त्री ओळखून होते. मनोरंजनाबरोबरच एखादा ठोमट, क्लिष्ट ज्ञानात्मक विचार मांडून तोही वाचकांच्या गळी उतरविण्याची बाळशास्त्र्यांची हातोटी दुर्लक्षून चालणार नाही. `हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलाम-गिरीचा प्रकार आहे,` व `या देशावर रूशियनांचा हल्ला होण्याचे भय"या लेखामधून बाळशास्त्र्यांनी अशाचस्वरूपाचे लेखन केलेले आहे. एकंदरीत `दर्पण` च्या सर्वच लेखनात आपुलकी, तळमळ, समाजसुधारणेची

घडपड, देशाला प्रगतीपथाकडे नेण्याची जिद्द मराठीतील पहिल्याच वृत्तपत्रात दिसून येते यात वादच नाही.

अग्रलेख व स्फुटलेखांचे स्वरूप

`दर्पण` मधील लेखांचे स्वरूप पहात असताना वैयक्तिक आणि राजकीय तसेच सामाजिक लेखांचे स्वरूप वेगळे करणे विवेचनाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल. व्यक्तिनिर्देश न करता केवळ सामाजिक किंवा राजकीय सुधारणेचा विचार केला तर जे लेख आपल्यासमोर येतात त्यांचे स्वरूप इंग्रजधार्जिणे असेच आहे. इंग्रजी सत्तेचा झालेला अंमल व त्याआधारे एतद्देशीय समाजावर झालेला परिणाम या दोहोंच्या संयुक्त परिणामातून जी एक सामाजिक चळवळ सुरू झाली त्यांचे दृश्य स्वरूप बाळशास्त्री जांभेकरांच्या अग्रलेखामध्ये दिसून येते.

` पत्रव्यवसायात मानवी स्वभावाच्या निरिक्षणाला खूप अवसर असतो. जितका वृत्तपत्रकाराचा अनुभव व्यापक व निरिक्षण सूक्ष्म तितके त्याचे लेखन सकस व प्रत्ययकारी.... ललित लेखनाच्या निर्मितीत कलावंताच्या मन:स्थितीला आणि मनस्वास्थ्याला फार महत्व आहे. पत्रकाराला मन:स्थितीच्या अनुषंगाने जाऊन चालत नाही. ललित लेखका इतकी सवड आणि स्वास्थ्य मिळतेच असे नाही ..... काळ हा हातामध्ये हातोडा घेऊनच पत्रकाराच्या मानगुटीवर बसलेला असतो, किंवा अधिक परिचयाची उपमा घेऊन बोलावयाचे झाल्यास परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्याप्रमाणे पत्रकाराची अवस्था असते. .... घाईघाईने लिहावयाचे आणि ते पुन्हा चांगले म्हणजे वाचनीय लिहावयाचे ही तर तारेवरची कसरत आहे. वेळेचे बंधन व वृत्तपत्रातील स्थलाची मर्यादा यामध्ये पत्रलेखकाला आपले लेखन बसवावे लागते, आणि त्याला आकर्षक, फर्मास शिर्षक देऊन त्याचे छान बारसेही करावे लागते.` (१)

KOLHAPUR UNIVERSITY

वरील उता-याकरून लक्षात येते की अग्रलेख ही संपादकाची आर्थिक परीक्षा असते. त्याचे वाचन, चिंतन, मनन, त्याचा अनुभव याचे सार अग्रलेखामध्ये प्रकट होत असते. एखाद्या विषयाबद्दलचे तर्कसंगत, सुसूत्र व प्रभावी प्रतिपादन म्हणजे अग्रलेख.

`दर्पण` मधील अग्रलेखातून व्यक्त झालेले विचार हे अभ्यासपूर्ण आणि व्यासंगी वृत्तीतून निर्माण झालेले आहेत. तत्कालीन कालखंड लक्षात घेतल्यास बाळशास्त्र्यांना इंग्रजांना दुखवायचे नसले तरीसुध्दा त्यांची भूमिका सामोपचाराचीच होती, हे दिसून येते. केवळ राजकीय पातळीवरच नव्हे तर समाजसुधारणेच्या बाबतीतही त्यांनी व्यक्त केलेली मते तत्कालीन परिस्थितीला सुसंगतच अशी आहेत. ब्रिटीशांची राजनिती सांगून त्यांच्यावर टीका करण्यापेक्षा जे आहे ते स्विकारार्ह कसे आहे हे सांगण्याचा प्रयत्न `दर्पण` कारांनी केल्याचे जाणवते.` नियतकालिक लेखापासून जे स्वार्थ होतात त्या विषयी,` `इंग्लंड देशातील राज्य-रितीत बदल करण्यासंबंधी यत्न,` `कलकत्यामध्ये हिंदू नाटकशाळा सुरू झाली,` `वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनात आलेल्या गोष्टी,` `विद्या हे बळ आहे,` `हिंदुस्थानातील नाचतमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे,` `स्वतंत्र व पक्षपात रहित वर्तमान पत्रापासून होणारी कार्ये व फळे` या अग्रलेखातील जांभेकरांचे युक्तिवादाचे कौशल्य, निवेदनातील तर्कशुध्दता, सुसुत्र व प्रभावी प्रतिपादन, मुद्दा पटवून देण्याचे कसब वाखाणण्यासारखे आहे. अग्रलेखातील विचार सडेतोड, अर्थपूर्ण, अभ्यासू व व्यासंगी लेखनातून निर्माण झालेले आहेत.

`दर्पण` मधील स्फूटलेखनाचे स्वरूपही असेच आहे. एखाद्या विषयाची अंगे-उपांगे लोकांसमोर ठेवणे, त्यांना जागृत करणे, ध्येयवादी बनविणे ही स्फूटलेखनाची वैशिष्टये `दर्पण` मध्ये आढळतात.शैक्षणिक

संबंधात व्यक्त झालेले विचार किंवा व्यक्तिचित्रणात्मक स्वरूपाचे लेखन यात कोणत्याही स्वरूपाचा आपमतलबीपणा नसला तरी आपण काही-तरी नवीन सांगत आहोत ही मात्र जाणीव बाळशास्त्र्यांच्या लेखनात वास करीत असते. हे स्फुटलेखही विविध विषयावरील आहेत. राजा राममोहन रॉय, सामळदास देसाभाई, ह्युइझोल साहेब, बाळशास्त्री घगवे यांच्या व्यक्तिमहात्म्या बरोबरच सामाजिक कर्तव्याची जाणीव लेखना-मध्ये स्पष्ट झालेली दिसून येते. वैयक्तिक स्वरूपाचे कार्य व्यक्त करीत असतानाच त्यांचा आदर्श जनतेसमोर ठेवणे, जनमत जागृत करणे, आणि एतद्देशीयांना समाजाभिमुख करणे हाही त्यांचा उद्देश होता. त्यामुळे आदर्शांच्या भावनेतून व्यक्तिकार्य व व्यक्तिमहात्म्य विशद केले आहे. आपली भूमिका स्पष्ट करीत असताना आपल्यावर होणारे आरोपही ते स्पष्ट करतात. `न्यु`च्या पक्षपाताच्या आरोपाला दिलेल्या उत्तरा-वरून कुणाचाही रोष न पत्करण्याची भूमिका येथे स्पष्ट होते. मुंबई, मद्रास आणि बंगाल प्रांतातील जमाखर्चाचे स्वरूप व्यक्त करताना राज-कारणातील अंतर्गत ठोकताळेही अतिशय समर्थपणे बाळशास्त्र्यांनी व्यक्त केलेले आहेत.

बाळशास्त्र्यांनी `दर्पण` मधून अग्रलेख व स्फुटलेख यांच्या-द्वारे शिक्षण, विज्ञान, धर्म, सामाजिक सुधारणा, राजकारण अशा बहुविध विषयावर लेखन केले. मराठी भाषेत अग्रलेख व स्फुटलेखांचे लेखन प्रथमत:च मांडले. आजच्या वृत्तपत्रसृष्टीला अग्रलेखांचा आणि स्फुटलेखांचा धडा `दर्पण` ने घालून दिला असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

लेखनशैली
--------

`दर्पण` मधील विविध लेखांचा विचार केल्यानंतर त्यातील

लेखनशैलीचा विचार करता येईल. `दर्पण` ची लेखनशैली सरळ, संथ स्वरूपाची असून त्यामध्ये फारसा आवेश जाणवत नाही. विचारांच्या प्रकटीकरणासाठी कोणत्याही स्वरूपाची बाह्य मदत न घेता किंबहुना अलंकारिकतेचा वापर न करता विधाने साध्या आणि सरळपणे व्यक्त केलेली आहेत. कधी कधी पाल्हाळीक स्वरूपाचे लेखन झाल्यामुळे लेखनात बालबोधपणा जाणवतो. लेखनाच्या एकंदर प्रवृत्तीकडे पाहिल्यानंतर हे लेखन बरेवर वाङ्मयाशी मिळते जुळते असे स्वरूप व्यक्त होते. या लेखनात प्रतिमा-प्रतिके यांचा फारसा वापर आढळून येत नाही. मनात जे आले ते लिहिले अशीच एकंदरीत या लेखनाची प्रवृत्ती दिसून येते. मधून केव्हा-तरी `जेव्हां झरा स्वच्छ होतो, तेव्हां त्यापासून वाहाणारे प्रवाह निर्मळ वाहातात.` अशी अर्थपूर्ण, सूचक वाक्ये येतात. निवेदनातील अभिजातपणा, बालबोधपणा व क्लिष्टता जाणवते. कारण विचारांचा ठसा वाचकांच्या मनावर बिंबविण्याच्या हेतूने बाळशास्त्र्यांनी भाषेला नटविण्याचा प्रयत्न केलेला नाही. मूळ विचारच कसदार असल्यामुळे त्याच्या अभिव्यक्तीला सजविण्याची आवश्यकता `दर्पण` कारांना वाटत नाही.

`दर्पण` मधील वाक्यरचना सर्वसामान्य मराठी सारखीच असली तरी काहीवेळा लांबलचक वाक्ये येतात. बऱ्याच वेळा तर खूपच मोठाली वाक्ये दृष्टीस पडतात. उदा.`रूशियनांची फौज वास्तवीक अटकनदी उतरून जय मिळवीत या आमचे संकुचित मुंबई बेटावर जरी येत असती, तरी ती सांप्रत आमचे लोकांचे मंडळीमध्ये कांही दिवसांपासून जा बातम्या बोलत आहेत त्या जे कित्येक मोठे लोक खऱ्या मानितात त्यापेक्षो आमचे एथील राहाणारे चांगले लोकांनी डोळें उघडून पाहिलें नसतें, किंवा त्यास अधिक भय वाटले नसतें.` किंवा `इकडे देशचा बखरा, आणि लोकांची स्थिती पाहिली असतां या देशचे लोकांत बुध्दी, आणि निती याचे दाखले बहुत आढळतात, कीं नेटिव लोकांमध्ये मोठीं कामें व

जस्तिस ऑफ दी पीस यांचें सोपें काम करायाजोगे, बुध्दिवान, बहुश्रुत आणि प्रामाणिक लोक सांपडणार नाहीत असा जो कित्येकांचा सिध्दांत आहे तो या दाखल्यावरून खोटा करीतां येतो असें लोकांस आम्ही विचारूं कीं या अधिकाराचे जागेवर सांप्रत या देशाचे लोकांस ठेवितात, आणि आमचे अंमलदारांनीं केलेले न्यायाची पुन: चौकशी करण्याचा अखत्यार देतात त्या जागेवर किंवा तालुक्याचे जमाबंदीचे किंवा दुसरे कोणतें कारभार खात्यांतील काम चालवावयास जे गुण पाहिजेत, त्यापेक्षां जस्तिस ऑफ दी पीस यांचे काम चालवायास अधिक पाहिजेत की काय ? असे लोकांचे मनात काय असेल ते असो, परंतु इतकें एक समजून मनास संतोष वाटतो कीं, आमचे राजाचें आम्हाविषयीं चांगलें लक्ष्य आहे, आणि आम्हास एकवेळ तपासून पाहावें असें त्याचे मनात आहे."

वरील प्रदीर्घ वाक्यरचनेत पाल्हाळ लावल्यामुळे अर्थ विस्कळीत झाल्याचे दिसून येते. इंग्रजी भाषेमधून आलेली विरामचिन्हे सर्रास वापरलेली आहेत. काही ठिकाणी अर्थ न लागणारी आणि संदिग्ध स्वरूपाची वाक्ये आढळतात. अर्वाचीन भाषेप्रमाणे त्याचा सरळ अर्थ लक्षात येत नाही. "दर आठवड्यास पाठवूं नये तर त्यांणी ते आम्हास कळे असें करावे," "त्याचे शरीरास आरोग्य आहे," "असे जर त्यांचे वर्तणुकीवरून दिसते नाहीं तर त्यास यापेक्षां मोठे उद्योग मिळतील अशी जी आशा आहे ती धरून फळनाही असे होईल." "इंग्रजी शाळा मांडली आहे" अशा स्वरूपाची बरीच वाक्ये अर्वाचीन भाषेचा विचार करता अर्थहीन वाटतात. बाळशास्त्र्यांनी मुळात इंग्रजी लिहिलेल्या मजकूराचे मराठीत भाषांतर करावे लागल्यामुळे कदाचीत वाक्यरचना विस्कळीत झाली असावी.

इंग्रजी आणि बहुविध विषयात बाळशास्त्र्यांनी नैपुण्य मिळविले

असल्यामुळे इंग्रजी लोकांपेक्षा आम्ही कमी नाही. त्यांच्याबरोबरीने आपणाही ताठ मानेने वाकू शकतो. या सार्थ अभिमानापोटी लेखाच्या प्रारंभीच `आम्ही` हा शब्द त्यांनी वारंवार वापरलेला दिसून येतो. उदा. `आम्ही आशा करीत आहो कीं,` `म्हणोन आम्हो प्रार्थना करतों कीं,` `आम्हीं हा कागद वाचणांरास कळवितों की` अशा स्वरूपाच्या वाक्यात `आम्ही ` या शब्दाचा जाणीवपूर्वक वापर बाळशास्त्र्यांनी केलेला आहे. तत्कालीन वाक्यशैलीचे खास नमुनेही मधून मधून पहायला मिळतात. `आम्हास काही समजत नाही असे होईल,` `हे पाहून आम्हास आश्चर्य वाटते,` `हे आमच्याने निश्चय सांगवत नाही,` `हे आमच्याने अगदी मान्य करवत नाही,` `आम्हास भरवसा वाटतो की,` `यात आम्हास संशय वाटत नाही,` `अगत्या-प्रमाणे फेरफार करून,` `असे वाटणे हे मुर्खत्व होय.` `आम्हास भरवसा वाटतो की फार अगत्य ठेवील अशी आमची खातर आहे.` तसेच `आमची खातर आहे की,` `असे आम्ही इच्छितो,` `आम्ही ऐकतो की,` अशा वाक्यांचा सर्रास वापर केलेला दिसून येतो. ही लेखनशैली तत्कालीन काळातील खास `दर्पण` कारांची होती. शिवाय `आश्चर्य-कारक,` `चमत्कारीक,` `जाहिर खबर,` `परमाणगी` हे शब्दही पुन: पुन: येतात. `दर्पण` मधील वाक्यरचना व्यामीश्र स्वरूपाची आहे. कधी कधी क्रियापदांची रूपे प्रथम येतात व कार्यकारणभाव नंतर सांगितला जातो. प्रदीर्घ वाक्यरचनेमुळे विचारात विसंगती निर्माण होते.

`दर्पण` मधील लेखनाचा अभ्यास करत असताना शब्दस्वरूप अभ्यासणेही लक्षणीय आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला मराठी भाषेतील शब्दरूपे पुढील प्रमाणे दिसून येतात. इथे इथ, इंग्रज > इंग्रेज, सारखे > सारिखे, इच्छितो > इछितो, म्हणून > म्हणोन, त्यांनी > त्यांणि, असते > असत्ये, येथील > एथील, त-हा > तऱ्हा,

प्रसिध्द > प्रसित्ध, करणा-याने > करणाराने, ज्या > जा,
कोणते > कोणत्ये, एका > एके, टाऊन हॉल > टौन हॉल,
पैसे > पैका, करतात > करितात, रशियन > रूशियन,
वाटण्यासाठी > वाटायासाठी, मानतात > मानितात, चौकशी > चवकशी
ज्याची > जांची, समृध्द > समृत्ध, सेक्रेटरी > सेक्रेतरी, चुका > चुक्या,
धान्य > दाणा, भागीदारी > बाहेदारी.

`दर्पण` मध्ये नि(य)मित, (स) ॅ, ब (शारी) तीचे, (प....प) त्राविचायी हा आरोप .... पैमाश खात्याची ... इत्यादी शब्द आणि त्यांची विशिष्ट रचना नेमकी कशासाठी केली होती हे स्पष्ट होत नाही. त्यातून नेमका अर्थबोधही होत नाही, की कोणतीही सूचकता प्रकट होत नाही. कदाचित त्या काळाची ती शैलीच असली पाहिजे.

याशिवाय `यामुळें आम्हांस निःसंशय वाटतें की, सरकारने इच्छिल्याप्रमाणें घडोन येईल,` `लोकांचे मनात येत असेल ते दूर करावे म्हणून लिहिले आहे.` `आम्ही आपले वाचणारांत प्रसिध्द करण्यास चुकणार नाही.` अशी खास वाक्येही `दर्पण` मध्ये आढळतात. लेखातील जी शब्दयोजना आहे तिचे अर्थ त्याकाळात वेगळे होते. उदा. योग्यतेस येणे - प्रगती, कां कीं - कुणास ठाऊक, फेरफार - बदल, रीती - पध्दती, अशेच लक्षाने - या हेतूने.

आजच्या वृत्तपत्रसृष्टीत तळटीपा दिल्या जात नाहीत. परंतु बाळशास्त्र्यांनी एखाद्या ग्रंथासारख्या १, २ असे आकडे टाकून किंवा (*) अशी फुली टाकून मजकूराच्या खाली वाचकांना अर्थ लावण्यासाठी तळटीपा दिल्या आहेत. खरं म्हटलं तर `दर्पण` चा अंक हा वाचकांच्या

हातात हप्त्याहप्त्याने पडणारा ग्रंथच होता. म्हणूनच ग्रंथलेखना-सारख्या तळटीपा वृत्तपत्रामध्ये जांभेकरांनी दिलेल्या आहेत.

`दर्पण` ची एकंदर शैली बरवर वाङ्मयासारखी वाटते. निवेदन ओजपूर्ण वाटत नाही. फारसे अलंकार, प्रतिमा नाहीत. इंग्रजी अंमलानंतर मराठी भाषेत इंग्रजी शब्दांची सरमिसळ झालेली होती. त्याची साक्ष म्हणजे `दर्पण`. बाळशास्त्री जांभेकर आणि वासुदेव जनार्दनजी संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक असल्यामुळे काहीसे संस्कृत प्राचुर्यही आढळते.

`दर्पण` मधील लेखनामधून संपादक बाळशास्त्री जांभेकरांच्या व्यक्तिमत्वाचे घडणारे दर्शनही दिसून येते. शिक्षक, विचारवंत, पत्रकार, लेखक, समाजसुधारक असे व्यक्तिमत्वाचे विविध पैलूही स्पष्ट होतात. कधी आदर्श पत्रकाराच्या भूमिकेतून नि:पक्षपाती व परखडपणे विचार मांडतात तर कधी शिक्षकाच्या भूमिकेतून प्रेमळ उपदेशही करतात. कधी विचारवंतांच्या भूमिकेतून तटस्थपणे राहून फक्त विचार ऐकवतात तर कधी देशाच्या कल्याणासाठी कळकळीने लिहितात. बाळ-शास्त्र्यांचा बहुश्रुतपणा, धिरगंभीरता, आणि विवेकवृत्ती पदोपदी जाणवते. प्रतिपक्षाबद्दल बोलत असताना शब्द अगदी जपून वापरतात. सरकारवर टीका करत असताना आक्रमक भाषेचा अगर शिवराळ शब्दांचा ते अजिबात वापर करीत नाहीत. बाळशास्त्र्यांच्या मृदू वाणीने सरकारलाही विचार करायला लावले आहे. कुणाशीही वैरत्व पत्करू नये अशीच त्यांची वृत्ती होती. नव्याकाळाबद्दलची महत्वाकांक्षा, आपुलकी आणि एतद्देशीयांबद्दलची आत्मीयता याचे प्रत्यंतर प्रत्येक लेखात दिसून येते. मोजक्या भाषेत अधिक अर्थ सांगण्याची पध्दती वाखाणण्या-सारखी आहे. उदा. `विद्या हे बळ आहे.`

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

`बाज` संपला की शिळेपण आले, असा आजच्या दैनिका-सारखा प्रकार `दर्पण` मधील लेखनाचा नाही. तत्कालीन वाचक चार-सहा महिन्याची शिळी वृत्तपत्रेही आनंदाने वाचत असत. `दर्पण` मध्ये ज्ञानदानाला अधिक महत्व असल्यामुळे एखाद्या ग्रंथासारखाच मजकूर `दर्पण` मध्ये असे. त्यामुळे एक अंक अनेकाकडून कित्येक दिवस वाचला जाई.

`दर्पण` चा उद्देश जसा एतद्देशीयांना ज्ञान करून देण्याचा होता तसा इंग्रज अधिका-यांना हिंदुस्थानच्या सर्वांगीण परिस्थितीचे आकलन करून देण्याचा होता. त्या साठीच `दर्पण` मध्ये एका बाजूला मराठी व एका बाजूला इंग्रजी मजकूर देण्यात येत असे. असंख्य इंग्रजी अधिका-यांना मराठी भाषा येत नसल्यामुळे त्यांना हिंदुस्थानातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांची उकल करून धावी म्हणून इंग्रजीमधून लेखन केलेले आहे. इंग्रजी लेखन करत असताना सरकारचा हिंदुस्थानबद्दल सहानुभीतीचा दृष्टीकोण निर्माण व्हावा आणि सरकारकडून अधीकाधिक सवलती, सुखसोई निर्माण करून घ्याव्यात अशाच पध्दतीने इंग्रजी लेखन झालेले आहे. बाळशास्त्र्यांना जनतेबरोबरच सरकारशी हातमिळवणी करून सुधारणा करायच्या होत्या. प्रसंगी इंग्रजी अधिका-यांच्यावर परखड टीका करून राज्यकारभारात सुसुत्रता निर्माण व्हावी या अनुषंगाने `दर्पण` चे इंग्रजी लेखन झालेले आहे. याकरून बाळशास्त्र्यांचा `दर्पण` मधील इंग्रजी व मराठी मजकूर देण्याचा मूळ उद्देश लक्षात येतो.

`दर्पण` मधील इंग्रजी भाषा जेवढी भारदस्त आणि संपन्न आहे तेवढी मराठी भाषा नाही. इंग्लंडमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि भौतिक बदल झाले असल्यामुळे तेथील इंग्रजी भाषेचा विकास झाला होता. विविध विषय त्या भाषेतून मांडणे शक्य

व्हावे एव्हढी इंग्रजी भाषा प्रौढ होती. बाळशास्त्र्यांसारख्या विद्वान संपादकाचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होतेच त्यामुळे `दर्पणा` तील इंग्रजी भाषा उत्तम असली तर नवल नाही. पण मराठी भाषेची स्थिती तशी नव्हती. मराठी गद्य नव्यानेच इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर आकाराला येत होते. `मराठी गद्याचा इंग्रजी अवतार` आकार घेत होता. नवनवीन विषय मराठीत प्रथमच मांडावे लागत होते. मारदस्त पाश्चात्य विद्या आपल्या अप्रौढ आणि असिध्द मराठीतून मांडावी लागली. त्यावेळचे एकूणच मराठी गद्य लेखन पाहिले तर ते अगदीच मामुली असल्याचे आढळते. भाषांतरे करून नवे विषय व त्यासाठी नवी भाषा एकप्रकारे घडविली जात होती. त्यावेळच्या बहुतेक सा-याच लेखनाची भाषा बोजडबोजड आणि रटाळवाणी होती.

पाश्चात्यांच्या आगमनामुळे सा-या हिंदुस्थानच्या समाज-जीवनात आमूलाग्र स्वरूपाचा बदल घडून आला. मराठी भाषिकांच्या जीवनात सुध्दा एक मन्वंतर घडून आले होते. सर्व क्षेत्रात नव्या गोष्टी मांडल्या जात होत्या. नव्या शिक्षणाचा परिचय करून देण्याची ही प्राथमिक धडपड होती. त्यामुळे विविध विषय मराठीतून मांडले गेले, हेच भाग्याचे मानायला हवे. वृत्तपत्रीय लेखनच नव्हे तर सबंध `वृत्तपत्र` हे अभूतपूर्व असे नवे साधन म्हणून उभे करावे लागले. वृत्तपत्रांचे लेखन तर धाईगर्दीचे असते आणि त्यातल्या त्यात सर्वसामान्य जनतेच्या वाचना-साठीच ते असते. यामुळे वृत्तपत्रातील भाषेबद्दल आजही आक्षेप घेण्यात येतात. `दर्पणा` तील भाषेकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे. कसे मांडले यापेक्षा काय मांडले हेच महत्वाचे आहे. त्यामुळे `दर्पणा` चे महत्व यादृष्टीने निःसंशय महान आहे.

`दर्पण` नियतकालिकाचा वाङ्मयीन अभ्यास करत असताना

व्याकरणदृष्टया दोष जरी त्यामध्ये असले तरी वैचारिक दृष्टया `दर्पण` चे कार्य नि:संशय महान आहे. वरकरणी `दर्पण` ची अभिव्यक्ती ओबडधोबड, रूक्ष असली तरी अंतरंग मात्र समृध्द आहे. `दर्पण` ने मराठी वाङ्.मयामध्ये निबंध वाङ्.मयाची पार्श्वभूमी घालून दिली. स्फुटलेख, अग्रलेख यांचा परिपाठ घालून दिला. मराठी भाषेला प्राथमिक अवस्थेमध्ये वळण लावण्याचा प्रयत्न केला. भौतिक विद्या, अनेकविध प्रश्न यांच्या निमित्ताने नवीन शब्दांची भर घातली. चौफेर विषयावर लेखन करून इतरांनाही बोलके, लिहिते केले. बदलत्या काळा-बरोबर `दर्पण` ने मराठी भाषेत बदल केलाच शिवाय नियतकालिक माध्यमाद्वारे इतरांनाही बदल करणेस भाग पाडले. `दर्पण` च्या रूपाने नियतकालिक हा वाङ्.मयाचा नवा प्रकार मराठीमध्ये अवतीर्ण झाला. त्यानिमित्ताने भाषांतराचाही प्रयत्न सुरू झाला. इंग्रजी राज्याच्या आगमनाने महाराष्ट्रात जे स्थित्यंतर घडले त्याची एक महत्वाची सांस्कृतिक साक्ष म्हणजे `दर्पण` होय.

इंग्रजी राज्य आल्यानंतरच महाराष्ट्रातील प्रबोधनयुगाला प्रारंभ झाला. या वैचारिक जागृतीचा स्फुल्लिंग बाळशास्त्र्यांच्या `दर्पण` मधील लेखनातून फुललेला दिसून येतो. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्.मयीन बाबतीत काळाच्या पुढे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी होती, म्हणूनच त्यांनी या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केली. एतद्देशीयांच्या हरएक प्रगतीसाठी त्यांनी आपली लेखणी चालविली. जनतेला सुज्ञ करून देशाला प्रगती पथावर नेण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच श्रेष्ठ आहे. बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्राला नव्हे तर हिंदुस्थानालाही प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी-च्या अवस्थेमध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी `दर्पण` मधील लेखनातून

समाज जागृतीसंबंधी मांडलेले विचार आणि समाजसुधारणेचे कार्य अनेक विचारवंताना प्रेरक ठरले. एकंदरीत सर्वांगीण बाबींचा विचार केल्यास बाळशास्त्री जांभेकर आणि `दर्पण` यांचे महत्व मोठे आहे हे मान्यच करावे लागते.

---0---

## प्रकरण चौथे

### - संदर्भ टीपा -


१) ग.गं.जांभेकर (सं.), आचार्य बाळशास्त्री जांभेकर: जीवनवृत्त व लेखसंग्रह, (१८१२-१८४६) खंड २, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९५०, पृ.२९.

२) तत्रैव, पृ.३१.

३) तत्रैव, पृ.५१, ५३.

४) तत्रैव, पृ.६१.

५) तत्रैव, पृ.६५.

६) तत्रैव, पृ. ६५.

७) तत्रैव, पृ. १७.

८) तत्रैव, पृ. ५६, ५७.

९) ल.रा.नसिराबादकर, आचार्य अत्रे : साहित्यदर्शन, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, १९७६. पृ. १७६, ८०.